# श्रीगुरूचरित्र अध्याय 14

श्रीगुरूचरित्र अध्याय 14 | Gurucharitra Adhyay 14

श्रीगणेशाय नमः ॥

श्रीसरस्वत्यै नमः

॥ श्रीगुरूभ्यो नमः ॥

नामधारक शिष्य देखा । विनवी सिद्धासी कवतुका ।
प्रश्न करी अतिविशेखा । एकचित्तें परियेसा ॥ १ ॥

जय जया योगीश्वरा । सिद्धमूर्ति ज्ञानसागरा ।
पुढील चरित्र विस्तारा । ज्ञान होय आम्हांसी ॥ २ ॥

उदरव्यथेच्या ब्राह्मणासी । प्रसन्न जाहले कृपेसीं ।
पुढें कथा वर्तली कैसी । विस्तारावें आम्हांप्रति ॥ ३ ॥

ऐकोनि शिष्याचें वचन । संतोष करी सिद्ध आपण ।
गुरूचरित्र कामधेनु जाण । सांगता जाहला विस्तारें ॥ ४ ॥

ऐक शिष्या शिखामणि । भिक्षा केली ज्याचे भुवनीं ।
तयावरी संतोषोनि । प्रसन्न जाहले परियेसा ॥ ५ ॥

गुरूभक्तीचा प्रकारू । पूर्ण जाणे तो द्विजवरू ।
पूजा केली विचित्रु । म्हणोनि आनंद परियेसा ॥।। ६ ।।

तया सायंदेव द्विजासी । श्रीगुरू बोलती संतोषीं ।
भक्त हो रे वंशोवंश । माझी प्रीति तुजवरी ॥ ७ ॥

ऐकोनि श्रीगुरूचें वचन । सायंदेव विप्र करी नमन ।
माथा ठेवून चरणीं । न्यासिता झाला पुन: पुन्हा ॥ ८ ॥

जय जया जगद्गुरू । त्रयमूर्तीचा अवतारू ।
अविद्यामाया दिससी नरू । वेदां अगोचर तुझी महिमा ॥ ९ ॥

विश्वव्यापक तूंचि होसी । ब्रह्मा-विष्णू- व्योमकेशी ।
धरिला वेष तूं मानुषी । भक्तजन तारावया ।। १० ।।

तुझी महिमा वर्णावयासी । शक्ती कैंची आम्हांसी ।
मागेन एक आतां तुम्हांसी । तें कृपा करणें गुरूमुर्ति ॥ ११ ॥

माझे वंशपारंपरीं । भक्ती द्यावी निर्धारीं ।
इह सौख्य पुत्रपौत्रीं । उपरी द्यावी सद्गति ॥ १२ ॥

ऐसी विनंति करूनी । पुनरपि विनवी करूणावचनीं ।
सेवा करितो द्वारयवनीं । महाशूरक्रूर असे ॥ १३ ॥

प्रतिसंवत्सरीं ब्राह्मणासी । घात करितो जीवेसीं ।
याचि कारणें आम्हांसी । बोलावीतसे मज आजि ॥ १४ ॥

जातां तया जवळी आपण । निश्चयें घेईल माझा प्राण ।
भेटी जाहली तुमचे चरण । मरण कैंचें आपणासी ।। १५ ।।

संतोषोनि श्रीगुरुमूर्ति । अभयंकर आपुले हातीं ।
विप्रमस्तकीं ठेविती । चिंता न करीं म्हणोनियां ॥ १६ ॥

भय सांडूनि तुवां जावें । क्रूर यवना भेटावें ।
संतोषोनि प्रियभावें । पुनरपि पाठवील आम्हांपाशी ।। १७ ।।

जंववरी तूं परतोनि येसी । असों आम्ही भरंवसीं ।
तुवां आलिया संतोषीं । जाऊं आम्ही येथोनि ॥ १८ ॥

निजभक्त आमुचा तूं होसी । पारंपरवंशोवंशीं ।
अखिलाभीष्ट तूं पावसी । वाढेल संतति तुझी बहुत ॥ १९ ॥

तुझे वंशपारंपरीं । सुखें नांदती पुत्रपौत्रीं ।
अखंड लक्ष्मी तयां घरीं । निरोगी होती शतायुषी ।। २० ।।

ऐसा वर लाधोन । निघे सायंदेव ब्राह्मण ।
जेथें होता तो यवन । गेला त्वरित तयाजवळी ॥ २१ ॥

कालांतक यम जैसा । यवन दुष्ट परियेसा ।
ब्राह्मणातें पाहतां कैसा । ज्वालारूप होता जाहला ॥ २२ ॥

विमुख होऊनि गृहांत । गेला यवन कोपत ।
विप्र जाहला भयचकित । मनीं श्रीगुरूसी ध्यातसे ॥ २३ ॥

कोप आलिया ओळंबयासी । केवीं स्पर्शे अग्नीसी ।
श्रीगुरुकृपा होय ज्यासी । काय करील क्रूर दुष्ट ॥ २४ ॥

गरूडाचिया पिलियांसी । सर्प तो कवणेपरी ग्रासी ।
तैसें तया ब्राह्मणासी । असे कृपा श्रीगुरूची ॥। २५ ।।

कां एखादे सिंहासी । ऐरावत केवीं ग्रासी ।
श्रीगुरूकृपा होय ज्यासी । कलिकाळाचें भय नाहीं ॥ २६ ॥

ज्याचे हृदयीं श्रीगुरूस्मरण । त्यासी कैंचें भय दारुण ।
काळमृत्यु न बाधे जाण । अपमृत्यु काय करी ॥। २७ ।।

ज्यासि नाहीं मृत्यूचें भय । त्यासी यवन असे तो काय ।
श्रीगुरूकृपा ज्यासी होय । यमाचें मुख्य भय नाहीं ॥ २८ ॥

ऐसेपरी तो यवन । अंत:पुरांत जाऊन ।

सुषुप्ति केली भ्रमित होऊन । शरीरस्मरण त्यासी नाहीं ।। २९ ।।

हृदयज्वाळा होय त्यासी । जागृत होवोनि परियेसीं ।
प्राणांतक व्यथेसीं । कष्टतसे तये वेळीं ॥ ३० ॥

स्मरण असें नसे कांहीं । म्हणे शस्त्रें मारितो घाई ।
छेदन करितो अवेव पाहीं । विप्र एक आपणासी ॥ ३१ ॥

स्मरण जाहलें तये वेळीं I धांवत गेला ब्राह्मणजवळी ।
लोळतसे चरणकमळीं । म्हणे स्वामी तूंचि माझा ॥ ३२ ॥

येथें पाचारिलें कवणीं । जावें त्वरित परतोनि ।
वस्त्रे भूषणें देवोनि । निरोप देतो तये वेळीं ॥ ३३ ॥

संतोषोनि द्विजवर । आला ग्रामा वेगवक्त्र ।
गंगातीरीं असे वासर । श्रीगुरूचे चरणदर्शना ॥ ३४ ॥

देखोनियां श्रीगुरूसी । नमन करी तो भोवसी ।
स्तोत्र करी बहुवसीं । सांगे करी वृत्तान्त आद्यंत ॥ ३५ ॥

संतोषोनि श्रीगुरुमूर्ति । तया द्विजा आश्वासिती ।
दक्षिण देशा जाउं म्हणती । स्थान-स्थान तीर्थयात्रे ॥ ३६ ॥

ऐकोनि श्रीगुरूचें वचन । विनवीतसे कर जोडून ।
न विसंबें आतां तुमचे चरण । आपण येईन समागमें ॥ ३७ ॥

तुमचे चरणाविणें देखा । राहों न शके क्षण एका ।
संसारसागर तारका । तूंचि देखा कृपासिंधू ।। ३८ ।।

उद्धरावया सगरांसी । गंगा आणिली भूमीसी ।
तैसें स्वामीं आम्हांसी । दर्शन दिधलें आपुलें ॥ ३९ ॥

भक्तवत्सल तुझी ख्याति । आम्हां सोडणें काय नीति ।
सवें येऊं निश्चितीं । म्हणोनि चरणीं लागला ॥ ४० ॥

येणेंपरी श्रीगुरूसी । विनवी विप्र भावेसीं ।
संतोषोनि विनयेसीं । श्रीगुरू म्हणती तये वेळीं ॥। ४१ ।।

कारण असे आम्हां जाणें । तीर्थे असती दक्षिणे ।
पुनरपि तुम्हां दर्शन देणें । संवत्सरीं पंचदशीं ॥ ४२ ॥

आम्ही तुमचे गांवासमीपत । वास करूं हें निश्चित ।
कलत्र पुत्र इष्ट भ्रात । मिळोनि भेटा तुम्ही आम्हां ॥ ४३ ॥

न करा चिंता असाल सुखें । सकळ अरिष्टें गेली दुःखें ।
म्हणोनि हस्त ठेविती मस्तकें । भाक देती तये वेळीं ॥ ४४ ॥

ऐसेपरी संतोषोनि । श्रीगुरू निघाले तेथोनि ।
जेथें असे आरोग्यभवानी । वैजनाथ महाक्षेत्र ॥ ४५ ॥

समस्त शिष्यांसमवेत । श्रीगुरू आले तीर्थे पहात ।
प्रख्यात असे वैजनाथ । तेथें राहिले गुप्तरूपें ॥ ४६ ॥

नामधारक विनवी सिद्धासी । काय कारण गुप्त व्हावयासी ।
होते शिष्य बहुवसी । त्यांसी कोठें ठेविलें ।। ४७ ।।

गंगाधराचा नंदनु । सांगे गुरूचरित्र कामधेनु ।
सिद्धमुनि विस्तारून । सांगे नामकरणीस ॥ ४८ ॥

पुढील कथेचा विस्तारू । सांगतां विचित्र अपारू ।
मन करूनि एकाग्रु । ऐका श्रोते सकळिक हो ॥ ४९ ॥

इति श्रीगुरूचरित्रामृते परमकथा कल्पतरौ
श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे
क्रूरयवनशासनं सायंदेवावरप्रदानं नाम चतुर्दशोऽध्याः ॥

॥ श्रीगुरूदत्तात्रेयार्पणमस्तु श्रीगुरूदेवदत्त॥